**वस्तू व सेवाकर विभाग, विशेष राज्यकर आयुक्त कार्यालय, तिसरा मजला, नवीन इमारत, माझगाव, मुंबई.**

**सेवानिवृत्त राज्यकर सहायक आयुक्त गट-अ व समकक्ष गट-अ अधिकारी (वेतनस्तर एस-25 पेक्षा कमी) यांची करारपद्धतीने नियुक्ती**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीबीई 1525/प्र.क्र.37/आस्थामं (का.13) दिनांक: 10 जून, 2025 मधील तरतुदीनुसार या विभागातील आस्थापना विषयक विवक्षित कामाचा अनुभव असणाऱ्या सेवानिवृत्त राज्यकर सहायक आयुक्त (गट-अ) व समकक्ष गट-अ अधिकारी (वेतनस्तर एस-25 पेक्षा कमी) यांच्याकडून विशेष राज्यकर आयुक्त कार्यालय, माझगाव, मुंबई येथे आस्थापनेवरील कार्यालयांकरिता एकूण 01 सेवानिवृत्त गट-अ अधिकारी (वेतनस्तर एस-25 पेक्षा कमी) यांना सेवा करार पद्धतीने घेण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

**विवक्षित कामाचा तपशिल -** वस्तू व सेवाकर विभागातील पदोन्नती प्रस्ताव (राज्यकर अधिकारी ते अपर राज्यकर आयुक्त), राज्यकर सहआयुक्त वरिष्ठ वेतनश्रेणी (25%) , राज्यकर उपआयुक्त निवडश्रेणी (33%), मानीव दिनांक विषयक प्रकरणे तसेच इतर अनुषंगिक कामे.

प्राप्त अर्जामधून पात्र उमेदवारांची निवड करून नामिकासुची तयार करण्यात येईल. सदर उमेदवारांमधून योग्य उमेदवाराची नेमणूक सामान्य प्रशासन विभाग क्र. क्र. सीबीई 1525/प्र.क्र.37/आस्थामं (का.13) दिनांक: 10 जून, 2025 या शासन निर्णयामधील अटी व शर्तींच्या अधिन राहून सुरूवातीला केवळ तात्पुरत्या स्वरूपात 3 महिन्यासाठी करण्यात येईल, संबधित अधिकारी यांचे काम नियुक्ती प्राधिकारी यांना समाधानकारक वाटल्यास नियुक्ती 11 महिन्यासाठी करार पद्धतीने करण्यात येईल. सदर नामिकासुचीची वैधता जास्तीत जास्त 3 वर्षे राहील तसेच त्या सूचीचा वार्षीक आढावा घेण्यात येईल.

<table>
<tr><th>विवक्षित कामाचा तपशिल व सर्वसाधारण अटी व शर्ती</th><th>आवेदन पत्र</th></tr>
<tr><td>
1. उपरोक्त नमूद केलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांना वस्तू व सेवाकर विभागातील पदोन्नती प्रस्ताव (राज्यकर अधिकारी ते अपर राज्यकर आयुक्त), राज्यकर सहआयुक्त वरिष्ठ वेतनश्रेणी (25%) , राज्यकर उपआयुक्त निवडश्रेणी (33%), मानीव दिनांक विषयक प्रकरणे तसेच इतर अनुषंगिक कामकाजाचा किमान तीन वर्षांचा अनुभव असावा.<br>
2. सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती वाढीव कालावधीकरिता दरवर्षी नूतनीकरण करता येईल, मात्र, एकुण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.<br>
3. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या 65 व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील. तथापि, ज्या व्यक्तिच्या सेवा त्यांनतर चालू ठेवणे आवश्यक आहे, असे मत असेल त्यांच्या सेवा सक्षम प्राधिकाऱ्यास एकस्तर वरीष्ठ अधिकाऱ्याच्या/प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने पुढे चालू ठेवता येतील. मात्र, कोणत्याही परिस्थितीत करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या 70 व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.<br>
4. सदर अर्जदार सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.<br>
5. अर्जदार शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.<br>
6. वित्तलब्धी/भत्ते/प्रवाभत्ता व दैनिक भत्ता - सामान्य प्रशासन विभाग क्र. क्र. सीबीई 1525/प्र.क्र.37/आस्थामं (का.13) दिनांक: 10 जून, 2025 या शासन निर्णयामधील तरतूदीनूसार.<br>
7. विशेष राज्यकर आयुक्त कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदोन्नती प्रस्ताव (राज्यकर अधिकारी ते अपर राज्यकर आयुक्त), राज्यकर सहआयुक्त वरिष्ठ वेतनश्रेणी (25%) , राज्यकर उपआयुक्त निवडश्रेणी (33%), मानीव दिनांक तयार करणे तसेच इतर अनुषंगिक कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.<br>
8. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी संबधित अधिकारी यांची करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.<br>
9. इतर अटी व शर्ती शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीबीई 1525/प्र.क्र.37/आस्थामं (का.13) दिनांक: 10 जून, 2025 मध्ये नमूद केल्याप्रमाणे असतील.
</td><td>
1. उमेदवाराचे संपूर्ण नाव.<br>
2. जन्म तारीख.<br>
3. संपर्कासाठीचा पत्ता.<br>
4. भ्रमणध्वनी क्रमांक.<br>
5. ई-मेल.<br>
6. सेवानिवृत्त होताना धारण केलेले पद.<br>
7. सेवानिवृत्तीचा दिनांक.<br>
8. सेवानिवृत्तीचे कार्यालय.<br>
9. सेवानिवृत्तीवेळची वेतनश्रेणी.<br>
10. सेवानिवृत्तीच्या अगोदर लगतच्या तीन नेमणुका.<br>
11. सेवानिवृत्तीच्या अगोदर लगतच्या पाच वर्षातील गोपनीय अहवालाची प्रतवारी.<br>
12. शैक्षणिक अर्हता.<br>
13. संगणकीय ज्ञान.<br>
14. विभागीय चौकशी प्रलंबित आहे काय असल्यास विवरण द्यावे.<br>
15. कार्यालयामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामाचा तपशील.(100 शब्दांमध्ये)<br><br>
स्वाक्षरी<br>
दिनांक
</td></tr>
</table>

Scanned with OKEN Scanner

वरील प्रमाणे पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या सेवानिवृत्त राज्यकर सहायक आयुक्त गट-अ व समकक्ष गट-अ अधिकारी (वेतनस्तर एस-25 पेक्षा कमी) यांनी **आस्थापना अधिकारी, विशेष राज्यकर आयुक्त कार्यालय, एफ विंग, नविन इमारत, 3 रा मजला, वस्तू व सेवाकर विभाग, माझगाव, मुंबई, ई-मेल- Est11.scst@gmail.com** यांच्याकडे जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून 15 दिवसांच्या आत ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने विहित नमुन्यातील अर्ज सादर करावेत.

सही /-
विशेष राज्यकर आयुक्त,
वस्तू व सेवाकर विभाग,माझगाव, मुंबई.

Scanned with OKEN Scanner